भारत सरकार

विधि व न्याय मंत्रालय

सत्यमेव जयते

# विमान अपहरण प्रतिबंधक अधिनियम, १९८२

**(१९८२ चा अधिनियम क्रमांक ६५)**

[ १९ मार्च, २००४ रोजी यथाविद्यमान ]

# The Anti-Hijacking Act, 1982

**(Act No. 65 of 1982)**

[*As in force on the 19th March, 2004*]

संचालक, शासन मुद्रण, लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन, मुंबई ४०० ००४ यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले

२००७

[**किंमत :** रुपये ११.००]

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक १९ मार्च, २००४ रोजी यथाविद्यमान असलेला दि ॲन्टी-हायजॅकिंग ॲक्ट, १९८२ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र**, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड १३, अंक २, दिनांक १४ ऑक्टोबर, २००४ यात पृष्ठ १५५ ते १५८ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक १४ ऑक्टोबर २००४.

**टी. के. विश्वनाथन,**
सचिव, भारत सरकार.

## PREFACE

This edition of the Anti-Hijacking Act, 1982 as on the 19th March, 2004 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in *Gazette of India*, Extraordinary, Part XII, Section 1, No. 2, Vol. 13, dated 14th October, 2004 on pages 155 to 158.

This authoritative text was published under the authority of the President under section 2, clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi,
Dated 14th October 2004.

T. K. VISWANATHAN,
Secretary to the Government of India.

# विमान अपहरण प्रतिबंधक अधिनियम, १९८२

## कलमांचा क्रम

कलमे


प्रकरण एक

**प्रारंभिक**

१. संक्षिप्त नाव, व्याप्ती, प्रयुक्ती व प्रारंभ.

२. व्याख्या.

प्रकरण दोन

**अपहरण आणि त्यासंबंधातील अपराध**

३. अपहरण करणे.

४. अपहरणासाठी शिक्षा.

५. अपहरणासह हिंसक कृत्यांसाठी शिक्षा.

५क. अन्वेषण, इत्यादीबाबतचे अधिकार प्रदान करणे.

६. अधिकारिता.

६क. पदनिर्देशित न्यायालये.

६ख. पदनिर्देशित न्यायालयाकडील संपरीक्षायोग्य अपराध.

६ग. पदनिर्देशित न्यायालयापुढील कार्यवाहीस संहिता लागू होणे.

प्रकरण तीन

**संकीर्ण**

७. प्रत्यर्पणविषयक तरतुदी.

७क. जमानतीची तरतूद.

८. अभिसंधीतील संविदाकारी पक्षकार.

९. अभिसंधी केलेल्या देशांमध्ये विवक्षित विमानाची नोंदणी करण्यात आली असल्याचे समजण्याचा अधिकार.

१०. खटला चालवण्यासाठी पूर्वमंजुरी आवश्यक असणे.

१०क. कलमे ४ व ५ खालील अपराध हे गृहीतक असणे.

११. सद्भावपूर्वक केलेल्या कारवाईस संरक्षण.

# विमान अपहरण प्रतिबंधक अधिनियम, १९८२

**(१९८२ चा अधिनियम क्रमांक ६५)**

(१९ मार्च, २००४ रोजी यथाविद्यमान)

[६ नोव्हेंबर, १९८२]

**विमानाच्या बेकायदेशीर अभिग्रहणाचा बिमोड करण्याकरिता अभिसंधी अंमलात आणण्यासाठी आणि त्याच्याशी संबंधित बाबींकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी,** हेग येथे दिनाकं १६ डिसेंबर, १९७० रोजी विमानाच्या बेकायदेशीर अभिग्रहणाचा बिमोड करण्यासाठी अभिसंधीवर सह्या करण्यात आल्या ;

**आणि ज्याअर्थी,** भारताने उक्त अभिसंधीत सहभागी होणे व ते अंमलात आणण्यासाठी व त्याच्याशी संबंधित बाबींकरिता तरतुदी करणे इष्ट आहे ;

**त्याअर्थी,** भारतीय प्रजासत्ताकाच्या तेहतिसाव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

## प्रकरण एक

## प्रारंभिक

**संक्षिप्त नाव, व्याप्ती, प्रयुक्ती व प्रारंभ.**

१. (१) या अधिनियमास "विमान अपहरण प्रतिबंधक अधिनियम, १९८२" असे म्हणावे.

(२) याचा विस्तार संपूर्ण भारतभर असेल व या अधिनियमात अन्यथा तरतूद करण्यात आली असेल त्याव्यतिरिक्त कोणत्याही व्यक्तीने भारताबाहेर केलेल्या कोणत्याही अपराधासाठी देखील तो लागू असेल.

(३) तो, केंद्र सरकार **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास[१] अंमलात येईल.

**व्याख्या.**

२. या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) "विमान" याचा अर्थ, लष्करी विमान किंवा सीमाशुल्क किंवा पोलीस सेवेत वापरले जाणारे विमान खेरीज करून, कोणतेही विमान-मग ते भारतात नोंदविण्यात आलेले असो वा नसो-असा आहे ;

(ख) "भारतातील नोंदणीकृत विमान" याचा अर्थ, भारतात, त्यावेळी नोंदणी करण्यात आलेले विमान, असा आहे ;

(ग) "अभिसंधी देश" याचा अर्थ, त्या त्यावेळी हेग अभिसंधी अंमलात असलेला देश, असा आहे ;

(घ) "हेग अभिसंधी" याचा अर्थ, दिनांक १६ डिसेंबर, १९७० रोजी हेग येथे स्वाक्षरी केलेला, विमानाच्या बेकायदेशीर अभिग्रहणाचा बिमोड करण्यासाठी अभिसंधी, असा आहे ;

(ङ) "लष्करी विमान" याचा अर्थ, कोणत्याही देशाची नौसेना, भूसेना, वायूसेना किंवा अन्य कोणत्याही सशस्त्र दलांचे विमान, असा आहे आणि त्यात, नेमून देण्यात आलेल्या प्रयोजनासाठी अशा कोणत्याही दलाच्या व्यक्तीच्या त्यावेळी अधिपत्याखाली असलेल्या प्रत्येक विमानाचा समावेश आहे.

## प्रकरण दोन

## अपहरण आणि त्यासंबंधातील अपराध

**अपहरण करणे.**

३. (१) जो कोणी, विमान उडत असताना, बळजबरीने किंवा बलाची धमकी देऊन किंवा अन्य कोणत्याही प्रकारे धाकदपटशा दाखवून, त्या विमानाचे बेकायदेशीरपणे अभिग्रहण करील किंवा त्या विमानावर नियंत्रण ठेवील तर, तो अशा विमानाचे अपहरण करण्याचा अपराध होईल.

---

[१] १५ नोव्हेंबर, १९८२ : पहा **भारताचे राजपत्र**, असाधारण, १९८२ भाग दोन, कलम ३ (दोन) अधिसूचना क्रमांक स्थायी आदेश ७९८ (ई), दिनांक १२ नोव्हेंबर, १९८२.

(२) जो कोणी, कोणत्याही विमानाच्या संबंधात पोटकलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेली कोणतीही कृती करण्याचा प्रयत्न करील किंवा अशा कोणत्याही कृतीस प्रोत्साहन देईल, तर तो देखील अशा विमानाचे अपहरण करण्याचा अपराध केला आहे असे समजण्यात येईल.

(३) या कलमाच्या प्रयोजनार्थ, जेव्हा विमानाची बाहेरील सर्व दारे विमानात बसल्यानंतर बंद करण्यात येतील, तेव्हापासून विमानातून उतरण्यासाठी असे कोणतेही दरवाजे उघडले जाण्याच्या क्षणापर्यंत विमान उड्डाणांतर्गत आहे असे मानण्यात येईल ; आणि विमान बलपूर्वक उतरवण्याच्या प्रकरणामध्ये, ते ज्या जागी बळजबरीने उतरविण्यात आले आहे त्या विमानाची व विमानामधील व्यक्तींची व मालमत्तेची जबाबदारी त्या देशाच्या सक्षम प्राधिकरणाकडून स्वीकारण्यात येत नाही तोपर्यंत, ते विमान उड्डाणांतर्गत असल्याचे मानण्यात येईल.

अपहरणासाठी शिक्षा.

४. जो कोणी, अपहरणाचा अपराध करीत असेल त्याला आजीव कारावासाची शिक्षा होईल व तो द्रव्यदंडाच्या शिक्षेसदेखील पात्र होईल.

अपहरणासह हिंसक कृत्यांसाठी शिक्षा.

५. जी कोणतीही व्यक्ती विमान अपहरणाचा अपराध करीत असताना अशा अपराधासह अशा विमानातील कोणत्याही प्रवाशाशी किंवा कर्मचारी वर्गाच्या सदस्याशी कोणतेही हिंसक कृत्य करील त्याला ; जर भारतात असे कृत्य करण्यात आले असते तर, भारतामध्ये त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यानुसार जी शिक्षा देणे पात्र ठरेल तीच शिक्षा देण्यात येईल.

[1][अन्वेषण, इत्यादीबाबतचे अधिकार प्रदान करणे.

५क. (१) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी, केंद्र सरकार, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे केंद्र सरकारच्या कोणत्याही अधिकाऱ्याला फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ अन्वये पोलीस अधिकाऱ्याद्वारे अटक करण्याचे, अन्वेषण करण्याचे आणि खटला चालविण्याचे अधिकार प्रदान करील.

(२) या अधिनियमाच्या तरतुदींच्या अंमलबजावणीसाठी, पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेल्या केंद्र सरकारच्या अधिकाऱ्याला सहाय्य करण्यास सर्व पोलीस अधिकारी व सर्व शासकीय अधिकारी यांना, याद्वारे आवश्यक करण्यात येत आहे आणि अधिकार प्रदान करण्यात येत आहेत.]

अधिकारिता.

६. (१) पोटकलम (२) च्या तरतुदींना अधीन राहून, कलम ४ किंवा कलम ५ खालील अपराध भारताबाहेर करण्यात आलेला आहे, त्यावेळी असा अपराध करणाऱ्या व्यक्तीवर, जर असा अपराध भारतातील कोणत्याही ठिकाणी, ज्या ठिकाणी तो सापडला असेल तेथे घडलेला होता असे समजून याबाबत, कार्यवाही करण्यात येईल.

(२) न्यायालय, कलम ४ किंवा कलम ५ खाली, भारताबाहेर केलेल्या अशा शिक्षापात्र अपराधाची,—

(क) भारतामध्ये नोंदणी झालेल्या विमानात असा अपराध करण्यात आला असेल ;

(ख) ज्या कोणत्याही पट्टेदाराच्या धंद्याचे मुख्य ठिकाण आहे किंवा असे धंद्याचे ठिकाण कोठेही नाही मात्र तो भारताचा कायम रहिवासी आहे आणि त्याने काही कालावधीसाठी कर्मचारी वर्गाखेरीज विमान भाड्याने घेतले असेल अशा विमानात असा अपराध करण्यात आला असेल ; किंवा

(ग) अभिकथित अपराधी, भारताचा नागरिक आहे किंवा ज्यावेळी विमान भारतात उतरले त्यावेळी तो असा अपराध करण्यात आलेल्या संबंधित विमानात होता किंवा तो भारतात सापडला असेल, तर,

दखल घेईल अन्यथा दखल घेणार नाही.

---

१. १९९४ चा अधिनियम ३९, कलम २ द्वारे दाखल केले (१ ऑक्टोबर १९९६ रोजी व तेव्हापासून).

[1][पदनिर्देशित न्यायालये.

**६क.** (१) सत्वर संपरीक्षा करण्याच्या प्रयोजनासाठी, राज्य शासन, उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशाच्या सहमतीने, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट केले असेल त्याप्रमाणे अशा क्षेत्रासाठी किंवा क्षेत्रांसाठी पदनिर्देशित न्यायालय म्हणून फौजदारी न्यायालयाला, विनिर्दिष्ट करील.

(२) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, पदनिर्देशित न्यायालय, दैनंदिनतेच्या आधारे, व्यवहार्य असेल तितपत, संपरीक्षा करील.

पदनिर्देशित न्यायालयाकडील संपरीक्षायोग्य अपराध.

**६ख.** (१) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी,—

(क) या अधिनियमाखालील सर्व अपराध, कलम ६क च्या पोटकलम (१) खाली विनिर्दिष्ट केलेल्या पदनिर्देशित न्यायालयाकडून फक्त संपरीक्षायोग्य असतील ;

(ख) या अधिनियमाखाली आरोपी असलेल्या व्यक्तीला किंवा अपराध कृतीच्या संशयित व्यक्तीला, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) याच्या कलम १६७ च्या पोटकलम (२) किंवा पोटकलम (२क) नुसार दंडाधिकाऱ्यापुढे उभे करण्यात आल्यानंतर, असा दंडाधिकारी, जेथे न्यायिक दंडाधिकारी असेल तेथे, तो सर्वस्वी पंधरा दिवसांपेक्षा अधिक होणार नाही एवढ्या कालावधीसाठी आणि जेथे कार्यकारी दंडाधिकारी असेल तेथे, तो सर्वस्वी सात दिवसांपेक्षा अधिक होणार नाही एवढ्या कालावधीसाठी, त्याला योग्य वाटेल, अशा अभिरक्षेत, अशा व्यक्तीच्या स्थानबद्धतेस प्राधिकृत करील :

परंतु, असा दंडाधिकारी,—

(एक) जेव्हा, त्याच्यापुढे उपरोक्तप्रमाणे अशा व्यक्तीला उभे करण्यात आल्यानंतर ; किंवा

(दोन) त्याने प्राधिकृत केलेला स्थानबद्धतेचा कालावधी संपल्यावर किंवा संपण्यापूर्वी कोणत्याही वेळी,

जेव्हा अशा व्यक्तीची, स्थानबद्धता आवश्यक नाही असा विचार करून तो, अशा व्यक्तीला, अधिकारिता असलेल्या अशा पदनिर्देशित न्यायालयापुढे उभे करण्याचा आदेश देईल ;

(ग) पदनिर्देशित न्यायालय, खंड (ख) च्या अधीनतेने त्याच्यापुढे उभे करण्यात आलेल्या व्यक्तीच्याबाबत त्या कलमान्वये त्याच्या समोर ज्याला उभे करण्यात आलेले आहे अशा प्रकरणामधील, आरोपी व्यक्तीच्या संबंधात, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) कलम १६७ अन्वये प्रकरणाची संपरीक्षा करण्याची अधिकारिता असलेला दंडाधिकारी जे अधिकार वापरील तेच अधिकार वापरील ;

(घ) पदनिर्देशित न्यायालय, केंद्र सरकारच्या किंवा, यथास्थिति, राज्य शासनाच्या अधिकाऱ्याकडून, प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याच्या वतीने करण्यात आलेल्या तक्रारीचे अवलोकन केल्यानंतर त्या अपराधाची दखल घेऊन, आरोपीशिवाय संपरीक्षा करील.

(२) पदनिर्देशित न्यायालयाकडून, या अधिनियमान्वये अपराधाची संपरीक्षा करण्यात येईल तेव्हा, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) खाली ज्या आरोपीवर दोषारोप ठेवण्यासाठी जशी संपरीक्षा करण्यात येते त्याचप्रमाणे या अधिनियमाखाली अपराधाव्यतिरिक्त अन्य अपराधाचीदेखील संपरीक्षा करण्यात येईल.

पदनिर्देशित न्यायालयापुढील कार्यवाहीस संहिता लागू होणे.

**६ग.** या अधिनियमात अन्यथा तरतूद केलेली असेल त्या व्यतिरिक्त, पदनिर्देशित न्यायालयापुढील कार्यवाहीस फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) याच्या तरतुदी लागू असतील आणि पदनिर्देशित न्यायालयापुढे खटला चालविणारी व्यक्ती सरकारी अभियोक्ता असल्याचे समजण्यात येईल.].

१. १९९४ चा अधिनियम ३९, कलम २ द्वारे दाखल केले (१ ऑक्टोबर १९९६ रोजी व तेव्हापासून).

## प्रकरण तीन

## संकीर्ण

प्रत्यर्पणविषयक तरतुदी.

७. (१) कलम ४ व कलम ५ खालील अपराध प्रत्यर्पणयोग्य अपराध म्हणून अंतर्भूत करण्यात आल्याचे समजण्यात येतील आणि अभिसंधी केलेल्या देशांसह भारताद्वारे करण्यात आलेल्या सर्व प्रत्यर्पण तहांमध्ये तशी तरतूद करण्यात येईल आणि या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून त्या भारताला लागू करण्यात येतील व बंधनकारक असतील.

(२) या अधिनियमाखालील अपराधांना, प्रत्यर्पण अधिनियम, १९६२ (१९६२ चा ३४) लागू करण्याच्या प्रयोजनांसाठी अभिसंधी केलेल्या देशातील कोणतेही नोंदणीकृत विमान, कोणत्याही वेळी ते विमान उड्डाणांतर्गत असताना—मग तो काही काळ अन्य कोणत्याही देशाच्या अधिकारितेत असो किंवा नसो—तरी ते त्या देशाच्या अधिकारितेत असल्याचे समजण्यात येईल.

[1][जमानतीची तरतूद.]

[1][**७क.** (१) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाखालील शिक्षापात्र अपराधात आरोपी नसलेली व्यक्ती] जर, अभिरक्षेत असेल तर सोडून देण्याबाबत अर्ज केल्यास,---

(क) अशा सुटकेच्या अर्जास विरोध करण्यास सरकारी अभियोक्त्याला संधी देण्यात आल्यानंतर ; आणि

(ख) जेथे सरकारी अभियोक्त्याने अर्जास विरोध केला असेल तेथे तो अशा अपराधात दोषी नसल्याबाबत विश्वास ठेवण्यास वाजवी कारणे होती आणि म्हणून तो जमानतीवर असताना कोणताही अपराध करणे संभवनीय नाही याबाबत न्यायालयाचे समाधान झाल्यानंतर ;

त्याला जमानतीवर किंवा त्याच्या स्वतःच्या व्यक्तिगत बंधपत्रावर सोडण्यात येईल अन्यथा सोडण्यात येणार नाही.

(२) पोटकलम (१) मध्ये विनिर्दिष्ट जमानत मंजूर करण्यावरील मर्यादा ह्या फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) किंवा त्या त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही जमानत मंजूर करणाऱ्या कायद्याखालील मर्यादांव्यतिरिक्त मर्यादा असतील.

(३) या कलमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टी, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) याच्या कलम ४३९ खाली उच्च न्यायालयाच्या, जमानतीबाबतच्या विशेष अधिकारांना बाधक असतील असे समजण्यात येणार नाही.]

अभिसंधीतील संविदाकारी पक्षकार.

८. केंद्र सरकार, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, हेग अभिसंधीतील संविदाकारी पक्षकार कोण आहेत आणि अभिसंधीच्या तरतुदींचा वापर ते स्वतः कोणत्या मर्यादेपर्यंत करतात हे प्रमाणित करील आणि अशी कोणतीही अधिसूचना ही, त्यात प्रमाणित केलेल्या बाबींचा निर्णायक पुरावा असेल.

अभिसंधी केलेल्या देशांमध्ये विवक्षित विमानाची नोंदणी करण्यात आली असल्याचे समजण्याचा अधिकार.

९. जर केंद्र सरकारचे समाधान झाले की, हेग अभिसंधीच्या अनुच्छेद ५ च्या आवश्यक बाबी, कोणत्याही विमानाच्या संबंधात समाधानकारक आहेत तर केंद्र सरकार, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे असा निदेश देईल की, असे विमान या अधिनियमाच्या प्रयोजनाकरिता, अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे अशी अभिसंधी केलेल्या देशात नोंदणी केले असल्याचे समजण्यात येईल.

---

१. १९९४ चा अधिनियम ३९, कलम ४ द्वारे दाखल केले (१ ऑक्टोबर १९९६ रोजी व तेव्हापासून).

**खटला चालविण्यासाठी पूर्वमंजुरी आवश्यक असणे.**

१०. केंद्र सरकारच्या पूर्वमंजुरीखेरीज, या अधिनियमाखालील एखाद्या अपराधासाठी खटला दाखल करण्यात येणार नाही.

**[1][कलमे ४ व ५ खालील अपराध हे गृहीतक असणे.**

१० क. कलम ४ किंवा कलम ५ खालील अपराधासाठीच्या खटल्यात जर असे सिद्ध झाले कि,

(क) आरोपीजवळ सापडलेली शस्त्रे, दारूगोळा किंवा स्फोटके आणि अशा अपराधात वापरण्यात आलेली अशी शस्त्रे, दारूगोळा किंवा स्फोटके सारखीच होती असे समजण्यास पुरेसे कारण असेल ; किंवा

(ख) त्याने बळजबरीने धमकी देऊन किंवा अशा अपराध कृतीमध्ये सापडलेल्या कर्मचारीवर्गाशी किंवा प्रवाशाशी कोणत्याही अन्य प्रकारे धाकदपटशा केल्याचा पुरावा आहे,

तर पदनिर्देशित न्यायालय, जोपर्यंत असा अपराध सिद्ध केला जात नाही तोपर्यंत असा अपराध आरोपीने केला असल्याचे गृहीत धरील.]

**सद्भावपूर्वक केलेल्या कारवाईस संरक्षण.**

११. (१) या अधिनियमांच्या तरतुदींनुसार सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचे योजलेल्या अशा कोणत्याही कृतीबद्दल कोणत्याही व्यक्तीविरूद्ध कोणताही दावा, खटला किंवा अन्य वैध कार्यवाही दाखल करता येणार नाही.

(२) या अधिनियमाच्या तरतुदीनुसार सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचे योजलेल्या कोणत्याही कृतीमुळे झालेले कोणतेही नुकसान किंवा होणारे संभाव्य नुकसान याकरिता, केंद्र सरकारविरूद्ध कोणताही दावा किंवा अन्य वैध कार्यवाही दाखल करता येणार नाही.

---

१. १९९४ चा अधिनियम ३९, कलम ५ द्वारे दाखल केले (१ ऑक्टोबर १९९६ रोजी व तेव्हापासून).

# THE ANTI-HIJACKING ACT, 1982

## विमान अपहरण प्रतिबंधक अधिनियम, १९८२

इंग्रजी-मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| abetment | प्रोत्साहन | [Sec. 3(2)] |
| act of violence | हिंसक कृत्य | [Sec. 5] |
| alleged | अभिकथित | [Sec. 6(2)(c)] |
| ammunition | दारुगोळा | [Sec. 10A] |
| anti | प्रतिबंधक | [Sec. 1(1)] |
| application | प्रयुक्ती | [Sec. 1 (m.n.)] |
| bail | जमानत | [Sec. 7 A (1)(b)] |
| by force | बळजबरीने | [Sec. 3(1)] |
| commission | कृती | [Sec. 3(2)] |
| competent | सक्षम | [Sec. 3(3)] |
| conclusive evidence | निर्णायक पुरावा | [Sec. 8] |
| contracting party | संविदाकारी पक्षकार | [Sec. 8] |
| convention | अभिसंधी | [Preamble] |
| crew | कर्मचारीवर्ग | [Sec. 5] |
| custody | अभिरक्षा | [Sec. 6B (1) (b)] |
| custom | सेवाशुल्क | [Sec. 2(a)] |
| day-to-day | दैनंदिन | [Sec. 6A(2)] |
| designated court | पदनिर्देशित न्यायालय | [Sec. 6C (m.n.)] |
| detention | स्थानबद्धता | [Sec. 6B (1) (b)] |
| disembarkation | विमानातून उतरणे | [Sec. 3(3)] |
| embarkation | विमानात बसणे | [Sec. 3(3)] |
| executive | कार्यकारी | [Sec. 6B (1) (b)] |
| extent | व्याप्ती | [Sec. 1(m.n.)] |
| extraditable offence | प्रत्यर्पणयोग्य अपराध | [Sec. 7(1)] |
| gazette | राजपत्र | [Sec. 1(3)] |
| hijacking | विमान अपहरण | [Sec. 1(1)] |
| in a whole | सर्वस्वी | [Sec. 6B (1) (b)] |
| in flight | उड्डाणांतर्गत | [Sec. 3(2)] |
| in good faith | सद्भावपूर्वक | [Sec. 11(1)] |
| intimidation | धाकदपटशा | [Sec. 3(1)] |
| investigation | अन्वेषण | [Sec. 5A] |
| jurisdiction | अधिकारिता | [Sec. 7 (2)] |
| lease | भाड्याने घेणे | [Sec. 6 (2) (b)] |
| lessee | पट्टेदार | [Sec. 6 (2) (b)] |
| likely | संभवनीय | [Sec. 7A (1) (b)] |

| | | |
|---|---|---|
| magistrate | दंडाधिकारी | [Sec. 6B (1) (b)] |
| notification | अधिसूचना | [Sec. 1 (3)] |
| on board | विमानामधील | [Sec. 3 (3)] |
| passenger | प्रवासी | [Sec. 5] |
| perusal of a complaint | तक्रारीचे अवलोकन | [Sec. 6B (1) (d)] |
| previous sanction | पूर्वमंजुरी | [Sec. 10] |
| public prosecutor | सरकारी अभियोक्ता | [Sec. 7A (1) (a)] |
| punishable | शिक्षापात्र | [Sec. 7A (1)] |
| reasonable ground | वाजवी कारण | [Sec. 7A (1) (b)] |
| registered | नोंदणीकृत | [Sec. 2 (b)] |
| seizure | अभिग्रहण | [Preamble] |
| speedy trial | सत्वर संपरीक्षा | [Sec. 6A (1)] |
| suppression | बीमोड | [Preamble] |
| suspect | संशयित | [Sec. 6B (1) (b)] |
| to give effect | अंमलात आणणे | [Preamble] |
| to require | अपेक्षित असणे | [Sec. 2] |
| treaty | तह | [Sec. 7(1)] |
| under commanded | अधिपत्याखाली | [Sec. 2(e)] |

## विमान अपहरण प्रतिबंधक अधिनियम, १९८२

## THE ANTI-HIJACKING ACT, 1982

### शब्दसूची

मराठी-इंग्रजी

| | | |
|---|---|---|
| अधिकारिता | jurisdiction | [कलम ७(२)] |
| अधिपत्याखाली | under commanded | [कलम २(ङ)] |
| अधिसूचना | notification | [कलम १(३)] |
| अन्वेषण | investigation | [कलम ५ क] |
| अपेक्षित असणे | to require | [कलम २] |
| अभिकथित | alleged | [कलम ६(२) (ग)] |
| अभिग्रहण | seizure | [उद्देशिका] |
| अभिरक्षा | custody | [कलम ६ ख (१) (ख)] |
| अभिसंधी | convention | [उद्देशिका] |
| अंमलात आणणे | to give effect | [उद्देशिका] |
| उड्डाणांतर्गत | in flight | [कलम ३(२)] |
| कर्मचारीवर्ग | crew | [कलम ५] |
| कार्यकारी | executive | [कलम ६ ख (१) (ख)] |
| कृती | commission | [कलम ३(२)] |
| जमानत | bail | [कलम ७ क (१) (ख)] |
| तक्रारीचे अवलोकन | perusal of a complaint | [कलम ६ ख (१) (घ)] |
| तह | treaty | [कलम ७(१)] |
| दारुगोळा | ammunition | [कलम १० क] |
| दैनंदिन | day-to-day | [कलम ६ क (२)] |
| दंडाधिकारी | magistrate | [कलम ६ ख (१) (ख)] |
| धाकदपटशा | intimidation | [कलम ३(१)] |
| नोंदणीकृत | registered | [कलम २(ख)] |
| निर्णायक पुरावा | conclusive evidence | [कलम ८] |
| पट्टेदार | lessee | [कलम ६ (२) (ख)] |
| पदनिर्देशित न्यायालय | designated court | [कलम ६ क (स.टी.)] |
| पूर्वमंजुरी | previous sanction | [कलम १०] |
| प्रतिबंधक | anti | [कलम १(१)] |
| प्रत्यर्पणयोग्य अपराध | extraditable offence | [कलम ७(१)] |
| प्रवासी | passenger | [कलम ५] |
| प्रयुक्ती | application | [कलम १ (स.टी.)] |
| प्रोत्साहन | abetment | [कलम ३(२)] |
| बळजबरीने | by force | [कलम ३(१)] |
| बीमोड | suppression | [उद्देशिका] |
| भाड्याने घेणे | lease | [कलम ६ (२) (ख)] |

| | | |
|---|---|---|
| राजपत्र | gazette | [कलम १(३)] |
| विमान अपहरण | hijacking | [कलम १(१)] |
| विमानात बसणे | embarkation | [कलम ३(३)] |
| विमानातून उतरणे | disembarkation | [कलम ३(३)] |
| विमानामधील | on board | [कलम ३(३)] |
| वाजवी कारण | reasonable ground | [कलम ७ क (१) (ख)] |
| व्याप्ती | extent | [कलम १ (स.टी.)] |
| शिक्षापात्र | punishable | [कलम ७ क (१)] |
| सरकारी अभियोक्ता | public prosecutor | [कलम ७ क (१) (क)] |
| सक्षम | competent | [कलम ३(३)] |
| सत्वर संपरीक्षा | speedy trial | [कलम ६ क (१)] |
| सद्भावपूर्वक | in good faith | [कलम ११ (१)] |
| सर्वस्वी | in a whole | [कलम ६ ख (१) (ख)] |
| सेवाशुल्क | custom | [कलम २(क)] |
| संभवनीय | likely | [कलम ७ क (१) (ख)] |
| संविदाकारी पक्षकार | contracting party | [कलम ८] |
| संशयित | suspected | [कलम ६ ख (१) (ख)] |
| स्थानबद्धता | detention | [कलम ६ ख (१) (ख)] |
| हिंसक कृत्य | act of violence | [कलम ५] |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई